# स्नेहदीप

न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाचे त्रैमासिक

वर्ष १, अंक १ - जानेवारी २०११



## स्नेहदीप संपादक मंडळ

| | |
|---|---|
| संपादक: | संजय गोखले |
| सहसंपादक: | आरती देशपांडे |
| | दीपा इनामदार |
| | सचिन बादरायणी |
| विशेष सहाय्य: | निशांत बागुल |
| | अभय देशपांडे |
| | अनिरुद्ध किनरे |

## महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क विद्यमान कार्यकारिणी

| | |
|---|---|
| अध्यक्ष: | निशांत बागुल |
| उपाध्यक्ष: | दिलीप शेट्ये |
| कार्यवाह: | समीर चौथाई |
| कोषाध्यक्ष: | मानसी करंदीकर |
| सदस्य: | अश्विनी कुलकर्णी |
| | रवी गवाणकर |
| | पराग मराठे |
| | आनंद दळवी |

## स्नेहदीप: जाहिरात दर

| | |
|---|---|
| संपूर्ण पान: | $70.00 |
| अर्धे पान: | $40.00 |
| पाव पान: | $25.00 |
| अष्टमांश पान: | $15.00 |
| अष्टमांश पान: (विवाहविषयक) | $10.00 |

वार्षिक जाहिरातींस १० टक्के सवलत आहे.


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | २ |
| महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क – दिवाळी २०१० --आरती देशपांडे | ३ |
| शब्द --डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर | ६ |
| नखचित्रकार सुहास तवकर यांची मुलाखत --संजय गोखले | ८ |
| कशेळी, उगवत्या सूर्याचे गाव --जयंत विठ्ठल कुळकर्णी | १२ |
| दोन अभिनव पाककृती --नीला इनामदार | १५ |
| खाजवा डोके / Brainteaser | १६ |


## स्नेहदीप: संपादकीय धोरण

- स्नेहदीप दर वर्षी जानेवारी, एप्रिल, जुलै व ऑक्टोबर महिन्यात प्रकाशित होईल.
- स्नेहदीपसाठी कथा, कविता, प्रवासवर्णन, लेख व इतर साहित्याचे स्वागत आहे. साहित्य snehadeep@maharashtramandalny.com या पत्त्यावर ई-मेलने पाठवावे. साहित्याचा मोबदला दिला जात नाही.
- साहित्य मराठी किंवा इंग्रजीत असावे. मराठी टंकलिखित साहित्य कोणत्याही युनिकोड फॉँटमधे असणे आवश्यक आहे. हस्तलिखित साहित्य स्कॅन करून पाठवावे.
- साहित्य प्रकाशित करण्याबाबतचा, तसेच साहित्यात किरकोळ दुरुस्त्या व कपात करण्याचा अधिकार संपादक मंडळाकडे आहे.
- साहित्याची निवड करताना न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाच्या आजी व माजी सभासदांच्या साहित्याला प्राधान्य देण्यात येईल.
- प्रकाशित साहित्यातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.
- स्नेहदीपमधील जाहिरातींतील उत्पादने व सेवांसाठी महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क कोणत्याही प्रकारे जबाबदार नसेल.

# संपादकीय

आज मकरसंक्रांत. मकर राशीतून सूर्याच्या संक्रमणाचा दिवस. थंडीने कुडकुडणाऱ्या तनांना व प्रदीर्घ काळोख्या रात्रींनी झाकोळलेल्या मनांना, आगामी उबदार व प्रकाशमय कालाचे आश्वासन देणारा दिवस! म्हणूनच की काय, सूर्यदेवतेच्या उत्तरायणाचा हा आरंभ भारतीयांनी प्राचीन काळापासून अत्यंत पवित्र मानला आहे. हा दिवस भारताच्या विविध भागांत विविध प्रकारे साजरा केला जातो. दक्षिण भारतात तो पोंगलचा एक भाग - सूर्यपोंगल - म्हणून साजरा होतो तर बंगाल व उत्तर भारतात तिळूआ संक्रांत किंवा पिष्टक संक्रांत म्हणून साजरा होतो. बहुतेक सर्वच ठिकाणी या दिवशी तिलदान देण्याची, तिळाचे पदार्थ करून वाटण्याची प्रथा आहे. महाराष्ट्रातही संक्रांतीच्या दिवशी आप्त-मित्रांना तिळगूळ देण्याची पद्धत आहे.

आपण मराठी लोक नुसता तिळगूळ देऊन थांबत नाही तर “तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला” असे आर्जवही करतो. हा ‘गोड गोड बोला’चा आग्रह धरण्याची प्रथा महाराष्ट्रात कधी सुरू झाली हे कळण्यास मार्ग नाही, पण ती का सुरू झाली याचे कारण मात्र उघड आहे. मराठी माणसाला ‘गोड बोला’ हे मुद्दाम सांगण्याची गरज आहे, कारण गोड बोलणे हा मराठी माणसाचा स्वभावधर्म नाही. या मराठी स्वभावाचे वर्णन करताना कवी केशवसुतांनी संक्रांतीच्या हलव्याचाच दृष्टांत दिला आहे. केशवसुत म्हणतात,

हलवा करिता तिळावर जसे कण चढती पाकाचे
अहंस्फूर्तिच्या केंद्राभवती वेष्टन तेवि जडाचे
आत समचि निर्गुण तिलक वरि सगुण सरळ तो पाक
परि अन्या बोचाया धरितो काटे की प्रत्येक ...

सर्वांच्या ठायी असलेली आंतरिक उर्जा जर एकच आहे, त्यावरील जडदेहाचे घटकही जर समान आहेत, तर मग काटेरी हलव्याप्रमाणे आपण एकमेकांना बोचकारे का काढतो? या प्रश्नाला साधे सरळ उत्तर नाही. स्वभावात मार्दव असावे हे जाणणे सोपे आहे पण ते अंगी बाणवणे कठीण आहे. सर्वांशी सर्व वेळ गोड बोलायचे तर मग आपल्या सुप्रसिद्ध(?) मराठी बाण्याचे काय? फटकळ, सडेतोड स्वभावाचे काय? मनाला पटले नाही तरी उगीचच गोड बोलायचे का?...

या प्रश्नांचे उत्तर संस्कृत सुभाषितकारांनी फार सुंदर रीतीने दिले आहे. सुभाषितकारांनी सनातन धर्माची व्याख्या करताना म्हटलं आहे -

सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम् ।
प्रियं च नानृतं ब्रूयात् एष धर्मः सनातनः ॥

अर्थ असा आहे: *सत्य बोलावे, दुसऱ्याला रुचेल असे बोलावे. दुसऱ्याला रुचणार नाही असे सत्यही बोलायचे टाळावे. तसेच केवळ दुसऱ्याला रुचेल म्हणून खोटे बोलू नये. हाच आपला सनातन धर्म आहे.* विस्मृतीच्या धुक्याने अंधुक झालेल्या या तत्त्वाला दर वर्षी उजाळा देण्यासाठीच ही गोड बोलण्याची पुस्ती संक्रांतीच्या तिळगुळाला जोडली गेली असावी.

मंडळी, आज या मकरसंक्रांतीच्या शुभदिनी हा ‘स्नेहदीप’रूपी तिळगूळ आपल्याला सादर करत आहोत व ‘गोड बोला’ अशी आग्रहाची विनंती करत आहोत. एक पाऊल पुढे जाऊन असेही म्हणावेसे वाटते की वेळप्रसंगी गोड बोलला नाहीत तरी चालेल, पण बोलत राहा. कारण आपल्या सर्वांमधील संवाद वाढावा हाच स्नेहदीपचा प्रमुख उद्देश आहे.

कळावे, लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

**संजय गोखले**
sanjaygokhale@hotmail.com

# महाराष्ट्र मंडळ, न्यू यॉर्क – दिवाळी २०१०

आरती देशपांडे

न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळाचा २०१० मधील दिवाळीचा कार्यक्रम नेहमीच्या उत्साहाने पार पडला. मनोरंजनाच्या विविध कार्यक्रमाबरोबरच ह्या वर्षी विविध स्पर्धाही आयोजित केल्या होत्या. ह्या स्पर्धांमध्ये लहान मुलांबरोबर मोठ्यांनीही भाग घेतला. ह्या स्पर्धा होत्या रांगोळी, फराळाचे पदार्थ आणि कंदील करण्याच्या.



रामदास पाध्ये व सौ. अपर्णा रामदास

कार्यक्रमाची सुरवात श्री. रामदास पाध्ये व त्यांच्या बोलक्या बाहुल्यांनी प्रेक्षकांचे स्वागत करून झाली. फक्त बच्चेकंपनीलाच नव्हे तर मोठ्यांनाही मनापासून हसायला लावून ह्या बाहुल्यांनी कार्यक्रमाची शानदार सुरवात करून दिली.

त्यानंतर न्यू यॉर्क आणि न्यू जर्सीच्या महाराष्ट्र मंडळांनी मिळून काढलेला ‘रंगदीप’ हा दिवाळी अंक प्रकाशित करण्यात आला. ह्या दिवाळी अंकाचे प्रकाशन दर वर्षी दिवाळीच्या कार्यक्रमात होते. हा उपक्रम गेली २० वर्षे चालू आहे. ह्या वर्षी ह्या अंकाचे प्रकाशन प्रसिद्ध समाजसेवक श्री. कौस्तुभ आमटे ह्यांच्या हस्ते झाले. रंगदीपच्या संपादिका, न्यू जर्सीच्या सौ. राजेश्री कुलकर्णी ह्यांनी ह्या समारंभाला उपस्थित राहून त्याची शोभा वाढवली.



श्री. कौस्तुभ आमटे रंगदीपचे प्रकाशन करताना

त्यानंतर मंडळाचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्र फौंडेशनचे सक्रिय कार्यकर्ते श्री. अनिरुद्ध किनरे ह्यांनी उपस्थितांना महाराष्ट्र फौंडेशनच्या कार्याची माहिती दिली. तसेच त्यांनी डॉ. आनंद बंग आणि श्री. कौस्तुभ व सौ. पल्लवी आमटे ह्यांच्याशी थोड्याशा गप्पाही मारल्या. ह्या गप्पांमधून सर्वांना हे समाजसेवक काम करत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती तर मिळालीच, त्याशिवाय त्यांना कोणत्या गोष्टींच्या मदतीची गरज आहे किंवा आपण त्यांना कोणत्या प्रकारे मदत करू शकतो याचीही कल्पना आली. ह्या प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमानंतर श्रीखंडपुरीची मेजवानी सर्व उपस्थितांना देण्यात आली. अर्थात डॉ. बंग, तसेच आमटे दांपत्य सभासदांच्या प्रश्नांना उत्तरे द्यायला किंवा अधिक माहिती द्यायला ह्या वेळेमध्ये हजर होतेच. त्यामुळे बऱ्याच जणांना त्यांच्याशी स्वतःहून संवाद साधण्याची संधीही मिळाली.



डॉ. आनंद बंग, श्री.कौस्तुभ व सौ. पल्लवी आमटे यांच्यसमवेत श्री. अनिरुद्ध किनरे



अदिती भागवत



गार्गी शिंदे

मनोरंजनाच्या कार्यक्रमाची सांगता 'कॉन्व्हर्सेशन्स इन ताल' ह्या गार्गी शिंदे आयोजित कार्यक्रमाने झाली. कु. अदिती भागवत ह्यांनी आपल्या नृत्यकौशल्याने सर्व प्रेक्षकांना भारावून टाकले. अर्थात गार्गी शिंदे ह्यांची सुरीली सतार व इतर वादकांचे सहकार्य ह्यामुळे ह्या कार्यक्रमाची रंगत काही औरच होती. भारतीय व पाश्चात्य संगीताचा इतका सुरेख मेळ जमला होता की हा कार्यक्रम कधी संपूच नये असे वाटत होते. पण काय करणार? सगळ्या चांगल्या गोष्टींचा अखेर शेवट हा होतोच. महाराष्ट्र मंडळाने सादर केलेल्या ह्या बहारदार शेवटच्या कार्यक्रमाने २०११ च्या कार्यक्रमांबद्दल सभासदांची उत्सुकता नक्कीच वाढली असेल.

सर्व सभासदांना २०११ च्या नववर्षाबद्दल शुभेच्छा!

aapdesh@yahoo.com

*****

## नवे वर्ष, नवे संकल्प

आपण सर्वजण दरवर्षी काही नवे संकल्प करत असतो. वजन कमी करणे, व्यायाम, इ. संकल्प बहुतेक सर्वचजण करतात (आणि ते मोडतात सुद्धा). तुम्ही जर नेहमीच्या पेक्षा काही विशेष, वेगळा संकल्प या वर्षीसाठी केला असेल तर आम्हाला जरूर कळवा.

आमचा पत्ता:

snehadeep@maharashtramandalny.com

## MATRIMONIAL-BRIDE

Correspondence invited for a healthy, affectionate 34 year old Maharashtrian Brahmin girl born in India - US citizen. Well settled IT professional seeks alliance with healthy, educated, outgoing, and considerate boy with similar cultural background and interest

---Please send details to
n_shaila2000@yahoo.com

# न्यू यॉर्कच्या 'आली ठुमकत'चे मुंबईत कौतुक



'आली ठुमकत' हा न्यू यॉर्कच्या 'मानसी आर्ट्स' या संस्थेद्वारे सादर केलेला लावणी नृत्यनाट्याचा कार्यक्रम मुंबईकरांच्याही कौतुकास पात्र ठरला आहे. अमेरिकेतील न्यू यॉर्क, बोस्टन, अल्बनी व वेस्टचेस्टर शहरांतील मराठी रसिकांनी वाखाणलेल्या या कार्यक्रमातील ३ लावणी नृत्ये व नाटकाची झलक झी टीव्हीच्या 'दिवाळीची पहाट' या कार्यक्रमात दाखवण्यात आली. परदेशात राहूनही येथील मराठी कलाकारांनी लावणीसारखा पारंपरिक नृत्यप्रकार इतक्या उत्तम रीतीने जोपासला आहे, या गोष्टीचे कार्यक्रमाच्या सादरकर्त्यांनी विशेष कौतुक केले. मानसी करंदीकर व त्यांच्या सहकलाकारांचे अभिनंदन!

याच कार्यक्रमातील एक कलाकार - जान्हवी कुकडे हिने नुकतेच इंग्लंडमधील हॅन्स्लो महाराष्ट्र मंडळात 'वाजले की बारा' हे लावणी नृत्य सादर केले. ते नृत्य व तिची मुलाखत, तेथील 'झी कॅफे' या टेलेविजन चॅनेलवर दाखवण्यात आली. जान्हवीचे अभिनंदन!

*****

## ॥ जीवेत शरद: शतम् ॥



**किनरे परिवार**

न्यू यॉर्कच्या लाँग आयलंडचे रहिवासी व महाराष्ट्र मंडळाच्या सर्व सभासदांना सुपरिचित असलेले **श्री. अरविंद किनरे** यांना २३ डिसेंबर २०१० रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त त्यांच्या कुटुंबियांनी १९ डिसेंबर रोजी हॉपॉग, लाँग आयलंड येथील शेरेटन हॉटेलमध्ये 'सरप्राईज पार्टी' आयोजित केली होती. हा अमृतमहोत्सवाचा सोहळा, रुचकर भोजन आणि न्यू जर्सीमधील कलामंचच्या हौशी कलाकारांनी सादर केलेल्या बहारदार गाण्यांनी अतिशय रंगतदार झाला.

श्री. अरविंद यांचे बालपण मुंबईच्या शिवाजीपार्क परिसरात गेले. ते मुंबईच्या ओरिएंट शाळेचे विद्यार्थी. पुढे ३५ वर्षे त्यांनी नॅशनल टेक्स्टाइल कॉर्पोरेशनमध्ये नोकरी केली. दरम्यानच्या काळात पुत्र व कन्या दोघेही अमेरिकेत स्थायिक झाल्यामुळे त्यांनी व पत्नी सौ. अरुंधती यांनी निवृत्तीनंतर अमेरिकेत स्थलांतर केले. १९९८ सालापासून त्यांचे अमेरिकेत वास्तव्य आहे.

महाराष्ट्र मंडळाच्या सर्व कार्यक्रमांना ते आवर्जून उपस्थित असतात. कार्यक्रमाइतकाच त्यांना उपस्थितांशी गप्पागोष्टी करण्यात रस असतो. कोणत्याही वयाच्या माणसाशी त्यांचे गप्पांचे गणित सहज जुळते. त्यामुळे ते केवळ मानसी व ईशाचे आजोबा न राहता, महाराष्ट्र मंडळातील अनेक तरुण मंडळींचे आजोबा झाले आहेत.

स्नेहदीपतर्फे किनरे आजोबांचे अमृतमहोत्सवानिमित्त अभिनंदन व शतकपूर्तीसाठी शुभेच्छा!

# शब्द

डॉ. उषादेवी विजय कोल्हटकर

अक्षरांना अर्थपूर्ण बनवायचे असेल तर तर अर्थ व भावार्थांचा मित्र बनण्यास योग्य शब्द शोधावे लागतात. भाषेची संकल्पना, परिभाषा शब्दांशिवाय अधुरी व संस्कृतीनिर्मिती, संस्कृती-संवर्धन व विकास, भाषा-विकासाशिवाय अशक्य. विविध भाषांतील साहित्य-समृध्दी, त्या त्या भाषेतील शब्दसंख्येच्या श्रीमंतीनेही तोलली जाते व इंग्रजी भाषेतील शब्दभांडार कौतुकास पात्र ठरते. बहुतेकांच्या जीवनाचे सार बनलेला एकाक्षरी शब्द 'मी' जेव्हा अमृता प्रीतमसारख्या संवेदनाक्षम कवयित्री, लेखिकेच्या लेखणीला स्पर्श करतो तेव्हा लेखिकेचे जीवन-दर्शन प्रगट होते.

"मैं कह रही हूँ कि मेरी जिंदगी की और मेरे
चिंतन की यात्रा सिर्फ एक अक्षर में हैं 'मैं' अक्षर में...
इस एक अक्षर की यात्रा का अब यह मुकाम हैं कि:
आज मैंने अपने घर का नंबर मिटा दिया है
और गली के माथे पर लगा गली का नाम हटा दिया है
और हर सडक की दिशा का नाम पोंछ दिया है...
अगर आपको – फिर भी मुझे पाना है
तो हर देश के हर शहर की, हर गली का द्वार खटखटाओ
और जहाँ स्वतंत्र आत्माकी झलक मिले
समझना – वह घर है..."

व्यक्तीचा अहंकारी 'मी', जेव्हा मीपणा विसरून स्वतंत्र आत्म्यासाठी घरकुल बांधतो, तेव्हा 'हे विश्वची माझे घर' या भारतीय संकल्पनेत सारे जग सामावते. शब्दांची कृतीबध्दता मानवतेला सुखाने श्वास घेण्याची परवानगी देते.

मृत्युंजयकार श्रध्येय शिवाजीराव सावंत यांना, माझ्या अथक कुतूहलात रविंद्रनाथांच्या 'काबुलीवाला' कादंबरीतील 'मिनी' दिसत असे. या मिनीला ते आत्मियतेने पत्रही लिहीत असत. एकदा मी त्यांच्या जन्मदिनानिमित्त लिहिलेल्या लेखाच्या शीर्षकाचे कौतुक करताना ते लिहून गेले, "हे शीर्षक मिनीच्या अर्थपूर्ण शब्दशोधी रसिक मनोवृत्तीचे द्योतक आहे." त्याच पत्रात 'शब्द' संकल्पनेच्या नेमक्या अर्थपूर्णतेचा, आत्मशोधी मागोवा घेणारी शिवाजीरावांची असामान्य प्रतिभा येशू ख्रिस्ताच्या अजरामर क्षमाशीलतेच्या पावलांजवळ येऊन थांबली, ती अशी:

दिनांक ४ सप्टेंबर १९९९

"मिनी, शब्द तेव्हाच सर्व मात्रांसह बोलके होऊन वाचकांशी संवाद साधतात जेव्हा रचनाकाराची तपस्या त्यांच्यामागे उभी असते. 'Oh God!' हा इंग्लीशमधील अनेकांनी, अनेक वेळा, अनेक प्रसंगी उच्चारलेला सर्वपरिचित साधा शब्द, पण जेव्हा तो क्रूसावर खिळलेल्या प्रभुच्या तोंडून उच्चारला गेला व 'Oh God! forgive them for they do not know, what they are doing!' अशा अमर वाक्याचा अंश म्हणून उच्चारला गेला तेव्हा केवढ्या सखोल व अर्थवाही छटा त्याला प्राप्त झाल्या. पुत्राच्या हाता पायांत खिळे रुतलेले

असताना पाहून ढसढसणाऱ्या प्रत्यक्ष Almighty च्या खांद्यावर थोपटून त्यालाही शांतवीत असलेल्या, करुणासागर-साक्षात जिजस उभे करण्याचे केवढे अबोल सामर्थ्य त्या ‘Oh God!’ मध्ये आहे. शब्दांच कार्य हे असं ‘सूर्यकिरणवत’ आहे. मिळेल तेवढा आवाका अनंत हातांनी कवटाळणारे हे एक अभिजात अमर वाक्य आहे. येशू ख्रिस्ताच्या या वाक्याने क्षमेचे महाकाव्य लिहिले व मानवाला निरपेक्ष मैत्रीचा महामंत्र दिला.”

येशू ख्रिस्ताने वधस्तंभावरून उच्चारलेल्या या अमर वाक्यातील प्रत्येक क्षमाशील शब्दात शत्रूंसाठीही प्रार्थना आहे, रदबदली आहे, दिलासा आहे, आश्वासन आहे. स्वत:वर होणारा अन्याय व असीम वेदनांना विसरून, जगत्-पित्याच्या सिंहासनसमोर गुडघे टेकणारी येशूची नम्रता, त्याचा अतोनात छळ करणाऱ्यांसाठी क्षमेची याचना करते आहे. दहशतवाद, शत्रुत्व, अन्याय, अत्याचाराचे वादळ शमविण्याचे बळ, या एका अमर वाक्यात आहे. येशूचे शत्रूलाही क्षमा करणे, हे अहिंसा तत्त्व महात्मा गांधींनीही मानले होते.

शब्द विधायक अर्थाने, समाज-प्रबोधनाचे प्रभावी माध्यम बनतात व माझे थोरले बंधु जयंतकुमार त्रिभुवन, येशूच्या विचारधनाचे सार पुढील शब्दात लिहून जातात “येशूला अपेक्षित प्रेमधर्म अखिल मानवांसाठी आहे. कुठल्याही विवक्षित जाती, धर्म, पंथापुरताच तो मर्यादित नाही म्हणूनच येशूने कदाचित नव्याने कुठला धर्म स्थापन केला नाही की कुणाचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न केला नाही. येशूला मानवाचे ‘स्वभावधर्मांतर’ अपेक्षित आहे आणि क्रियाशील प्रेमातूनच ते शक्य आहे असा येशूचा विश्वास आहे, हे मला प्रकर्षाने जाणवले.”

नारायण वामन टिळकांना, येशू ख्रिस्ताच्या तत्त्वप्रणालीचे माहात्म्य पटले व ‘ख्रिस्तार्पणमस्तु, अवघे ख्रिस्तार्पणमस्तु’ या संपूर्ण समर्पित भावनेने त्यांची मधुराभक्ती लिहून गेली:

“अर्थ, शब्द एकत्र राहुनी, शब्द सेवि अर्थास जसा,
स्वामी तू मम, मी सेवक तव, सदा असो संबंध असा”

अर्थाला स्वामी मानून, सेवकाची भूमिका स्वीकारून शब्द जेव्हा कृतींच्या सावलीत उभे राहातात तेव्हा ते सात्वंन, उत्तेजन, आधार, आपुलकी व मैत्रीचे माध्यम बनून ऋणानुबंधांना अर्थ देतात. शब्दांचे श्वासोच्छ्वास, जीवनदायी ठरावेत असे वाटत असेल तर शब्दांना हत्यार बनवून कोणाच्या मनाला, भावनांना घायाळ करू नका व शत्रुत्व वाढवू नका. एक चायनीज म्हण आहे “Kind words can warm for three winters while harsh words can chill even in the heat of summer.” त्यामुळे आपले विचार शब्दरूप घेत, जेव्हा कृतीबध्द होतात तेव्हा त्या कृती सुखदायी की दुख:दायी याचे भान जरूर ठेवावे. एका अमेरिकन कादंबरीकाराने लिहिले आहे, “शांत, निष्पाप शब्द, निमूटपणे शब्दकोशाच्या पानांवर उभे असतात. ते जेव्हा माणसांच्या हातात पडतात, तेव्हा तो, त्यांचे असे संयोजन किंवा संमिश्रण करतो की तेच शब्द, कमालीचे विध्वंसकही बनू शकतात.”

शब्दांना दीर्घायुष्य बहाल करण्यासाठी, कृतींना अर्थ देत, मानवसेवेचे साधन बनविण्याचे अगत्य असते आणि ते जिला सहज जमते ती संत महिला लिहून जाते, “kind words can be short and easy to speak but their echoes are endless.” -Mother Theresa.

मदर तेरेसाच्या दयापूर्ण शब्दांचे व कार्याचे प्रतिध्वनी अखिल विश्वामध्ये एकू येत आहेत व येत राहातील. ज्या शब्दांचे रचनाकार असे कालातीत असतात त्या शब्दांच्या डोळ्यात पाहाताच मानवतेच्या ओठांवर समाधानाचे हास्य सजते, कारण अशा कृतीबध्द शब्दांच्या मंत्रोच्चारातच ‘सत्यम्, शिवम, सुंदरम्’ सामावलेले असते.

**- उषादेवी कोल्हटकर (vijaykolhatkar@attglobal.net)**

# नखचित्रकार सुहास तवकर यांची मुलाखत

संजय गोखले

प्रसिद्ध नखचित्रकार आणि न्यू यॉर्कच्या महाराष्ट्र मंडळाचे एक सदस्य - श्री. सुहास तवकर यांच्याशी स्नेहदीपसाठी बातचीत करण्याचा योग आला. या अनोख्या कलेबद्दल त्यांचे विचार व या क्षेत्रातील त्यांची कामगिरी त्यांच्याच शब्दांतून सादर करत आहोत.



**प्रश्न:** आज जगात चित्रकला, शिल्पकला जशा प्रसिद्ध आणि सर्वांना परिचित आहेत तशी स्थिती नखचित्रकलेची नाही. ही नखचित्रकला म्हणजे नक्की काय?

**उत्तर:** नखचित्रकला ही नखाने करायची कला आहे. नखचित्र हा मूळ संस्कृत शब्द आहे आणि या कलेचा उगमही हिंदुस्थानातच झाला आहे. आज ही नखचित्रकला अवगत असलेले बोटांवर मोजण्याइतकेच कलाकार असावेत. ही कला भारताशिवाय अन्य कोणत्याही देशात माहीत नाही. फार पूर्वीपासून नखांचा उपयोग 'एन्ग्रेव्हिंग'साठी केला गेला, पण कागद जेव्हां बनायला लागला तेव्हां त्यावर 'रिलीफ' चित्रे काढली गेली असावीत. आज मी नखचित्रे निरनिराळ्या कागदांवर काढतो तसेच 'कॉपर' किंवा 'ॲल्युमिनिअम' वर सुद्धा नखांनी 'रिलीफ' चित्रे काढतो.

**प्रश्न:** मग अशा या विशेष प्रचलित नसलेल्या कलेत तुम्ही इतकं असाधारण प्रावीण्य कसं काय मिळवलं?

**उत्तर:** ही कला माझ्यात वंशपरंपरेने आली आहे. ही कला मी वडिलांकडून वयाच्या चौथ्या वर्षीच शिकण्यास सुरवात केली. माझ्या वडिलांनी नखचित्रकला त्यांच्या लहानपणीच त्यांच्या आईवडिलांकडून शिकून घेतली. माझ्या लहानपणी आम्ही जेव्हां जेव्हां ट्रॅमने जायचो, तेव्हां माझ्या वडिलांच्या हातात तिकीट मिळाले की ते त्या तिकीटावर मागच्या बाजूला खूपच सुंदर फुलांची चित्रे Relief करायचे व ते बघण्यात माझे मन ट्रॅमच्या खिडकीतून बाहेर बघण्यापेक्षा अधिक रमायचे. त्यांनी मिळवलेले नखचित्रांवरील प्रभुत्व आजही माझ्या डोळ्यांसमोर आहे.



"Ear"-NakhaChitra relief by my late father Anant G.Tavkar at the age of 89 in 1991 on a regular photostat paper as per my wish when he was in New York
Size: 2.75"X4"

**प्रश्न:** तुमच्या वडिलांच्या नखचित्रकलेवरील प्रभुत्वाची काही आठवण सांगाल का?

**उत्तर:** सुमारे २० वर्षांपूर्वी माझे वडील न्यू यॉर्कला आले असताना मी त्यांना नखचित्र काढण्याचा आग्रह केला. त्यावेळी ते ८९ वर्षांचे होते पण तरीही एका साध्या फोटोस्टॅट कागदावर त्यांनी कानाचे चित्र ज्या सहजतेने काढले तसे चित्र एखाद्या कसलेल्या तरुण नखचित्रकाराला प्रयत्न करूनही काढता येणार नाही. आजही तो नमुना मी जतन करून ठेवला आहे.

**प्रश्न:** एक कलाकार व नखचित्रकार म्हणून तुमच्या भारतातील व अमेरिकेतील अनुभवांविषयी काही सांगाल का?

**उत्तर:** मी शाळेत असताना माझ्या मित्रांची नावे कागदावर ‘एम्बॉस’ करायचो, सिगारेटच्या पाकिटातल्या ‘मेटल फॉइल’वर पण मराठीतून आणि इंग्रजीतून Calligraphy करायचो. ‘सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स’ला असताना USIS चा Exhibition Contractor म्हणून महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश येथे Book Exhibition घेऊन जायचो आणि USIS च्या पुस्तकालयाचे काम करत होतो. माझा स्वत:चा फोर्टमध्ये स्टुडिओ होता आणि मुंबईच्या जाहिरात कंपन्यांना मी एम्बॉसिंगची प्रेझेंटेशन्स नखाने करून द्यायचो. १९७७ साली मी न्यू यॉर्कला आलो आणि जाहिरात क्षेत्रात Freelancer म्हणून कामाला लागलो. तेथे सुद्धा नखांनी एम्बॉसिंगची प्रेझेंटेशन्स केली. १९८४ साली न्यू यॉर्कच्या U&LC या Typography Magazine मध्ये माझ्यावर व माझ्या नखचित्रांवर मोठा लेख प्रसिद्ध झाला. त्यानंतर बोस्टनच्या Calligraphy Now Book मध्ये नखचित्रांबद्दल लिहिले गेले, तसेच भारतीय वर्तमानपत्रांतून आणि न्यू यॉर्कच्या स्थानिक वर्तमानपत्रांतून लेख लिहिले गेले. मी न्यू यॉर्कला आल्यापासून बहुतेक सर्व जाहिरात कंपन्यांसाठी एम्बॉसिंगची प्रेझेंटेशन्स केली आहेत. माझा मुख्य व्यवसाय Graphic Artist असल्याने मी १९८० साली मॅनहॅटनमध्ये स्वतःचा Mechanical Art Studio चालू केला व रीडर्स डायजेस्टच्या संगीत विषयक विभागासाठी कामे करायला सुरवात केली. १९८४-८५ मध्ये आलेल्या मंदीमुळे मला १९८८ साली स्टुडिओ बंद करायला लागला व मी Grey Worldwide मध्ये Graphic Artist म्हणून कामाला लागलो. २००७ साली निवृत्त झाल्यावर मी नखचित्रांवर जास्त लक्ष द्यायचे ठरवले. आज मी नखचित्रकलेला जगात मान्यता मिळवून देण्यासाठी व ही कला जगाला समजावण्यासाठी प्रयत्न करतो आहे. न्यू यॉर्कच्या ITV आणि QPTV वर माझ्या मुलाखती झाल्या व त्यानंतर मला खूपच प्रतिसाद मिळाला. सध्या मी न्यू यॉर्कच्या मॅनहॅटन लायब्ररी व क्वीन्स लायब्ररीमध्ये मुलांसाठी, तसेच मोठ्या माणसांसाठी नखचित्र वर्कशॉप्स घेतो व ही आपली नखचित्रकला त्यांना समजून देण्याचा प्रयत्न करतो.





132 NEW DIMENSIONS

This raised letter was made by a unique twentieth-century expert, who hand-embosses intricate letters and designs with a specially sharpened fingernail. (With permission of Subas A. Tavkar. Photography by Wil Blanche.)

**प्रश्न:** प्रत्येक कलाकार हा कलेत केवळ प्रावीण्य मिळवून थांबत नाही, तर आपल्या कलेच्या क्षेत्रात स्वतःची अशी वेगळी छाप उमटवण्याचा प्रयत्न करतो. तुम्ही असा काही प्रयत्न केला आहे का?

**उत्तर:** अजंठा आणि खजुराहोच्या कोरलेल्या मूर्ती माझ्या नखाने कागदावर कशा ‘रिलीफ’ करता येतील याचा मी प्रयत्न करत असतो आणि आज मी बऱ्याचशा मूर्ती कागदावर ‘रिलीफ’ केल्या आहेत, तसेच खूप प्रकारचे गणपती ‘एम्बॉस’ केले आहेत. प्रत्येक नखचित्र काढताना ते आपले आपल्यालाच एक आव्हान आहे असे मला वाटते. मी जशी नखचित्रे काढतो तसेच गायत्री मंत्र व आपले इतर मंत्र हाताने कोरीव काम करून कागदावर आणि तांब्याच्या पत्र्यावर ‘एम्बॉस’ करतो.

**प्रश्न:** नखचित्रकला ही एक प्रकारची चित्रकला आहे असं मानलं तरी नखचित्रकलेची काही वैशिष्ट्ये आहेत का?

**उत्तर:** आहेत ना! नखचित्रकलेसाठी कोणत्याही साधनांची आवश्यकता नसते. देवाने दिलेले नख हेच साधन म्हणून वापरले जाते. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे नखचित्रात एकदा जर चूक झाली तर ती कधीच परत सुधारता येत नाही; ते चित्र परत पहिल्यापासून दुसऱ्या कागदावर किंवा 'मेटल'वर काढावे लागते. आणि एक गोष्ट मुद्दाम सांगावीशी वाटते ती म्हणजे नखचित्रे आपण जशी डोळ्यांनी पाहू शकतो तसेच आंधळेही त्यांच्या बोटांच्या स्पर्शाने बघू शकतात.

**प्रश्न:** अशा या वैशिष्ट्यपूर्ण कलेला जगात म्हणावी तशी मान्यता नाही याची खंत वाटते का? तिला मान्यता मिळावी म्हणून तुम्ही काही विशेष प्रयत्न करता आहात का?

**उत्तर:** आजपर्यंत कोणत्याच Art History च्या पुस्तकात नखचित्रांचा उल्लेख नाही आणि ही निराळी कला म्हणून कोठेच शिकवली जात नाही वा त्याबद्दल लिहिले जात नाही. आज जर तुम्ही इंटरनेटवर Art च्या websites पाहिल्यात तर एकाही ठिकाणी नखचित्रकला नाही, तर Paintings, Sculptures आणि इतर निरनिराळ्या माध्यमांतून चित्रे दाखवली आहेत. २००९ मध्ये नखचित्रांवर 'American Artist' च्या Drawing Magazine मध्ये मोठा लेख प्रसिद्ध झाला आणि मला त्यानंतर जगातून चांगला प्रतिसाद मिळाला. पहिला कलाविष्कार व पहिले सुलेखन (Calligraphy) ही आपल्या नखानेच चालू झाली असे माझे ठाम मत आहे व आज मी ते म्युझियम्सना पटवायचा प्रयत्न करतो आहे. माझ्या वडिलांनी नखचित्रकला एक छंद म्हणून जोपासली पण मला तिला व्यावसायिक स्वरूप द्यायचे आहे. ही कला One of a kind असून Collectors' Item म्हणूने मला या कलेला प्रसिद्धी मिळवायची आहे. जगात या कलेला महत्त्व मिळून ही कला जिवंत कशी ठेवता येईल यासाठी प्रयत्न करणे हेच माझ्या जीवनाचे ध्येय आहे. मी सध्या भारतात किती नखचित्रे काढणारे कलाकार आहेत व त्यांच्याशी कसा संपर्क साधता येईल या विचारात आहे.

**प्रश्न:** तुम्ही एक उत्तम नखचित्रकार आहात. तुमचे कलेसंबंधीचे विचार थोडक्यात सांगाल का?

**उत्तर:** मला लहानपणापासून नेहमी वाटायचे की हे आपले जग म्हणजे देवाने बनवलेली एक फार मोठी आर्ट गॅलरी आहे आणि हे तारे व ग्रह म्हणजे या गॅलरीतले Art Pieces आहेत. हे देवाने तयार केलेले प्रदर्शन बघण्यासाठी सूर्याचा प्रकाश सकाळी असतो तसाच रात्रीची शोभा पाहण्यासाठी चंद्राचा उजेड असतो. आतापर्यंत आपल्याला एवढेच माहीत आहे की पृथ्वी म्हणजे सर्वात सुंदर Art Piece आहे (जोपर्यंत आपल्याला जगात आपल्यासारखे सजीव असलेला दुसरा ग्रह मिळत नाही तोपर्यंत!). मला वाटायचे की समुद्र म्हणजे देवाने बनवलेले गूढ मत्स्यालय आहेत आणि त्यात निरनिराळे जिवंत मासे ठेवलेले आहेत. माझा लहानपणापासून खूप विश्वास होता आणि अजूनही तो माझ्या मनात कायम आहे की आपली पृथ्वी म्हणजे लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांना समाधान मिळेल असा प्रदर्शनातील सर्वात सुंदर Display Piece देवाने बनविलेला आहे. म्हणून मला वाटते की पृथ्वीवरचा प्रत्येक सजीव हा एक कलाकार आहे तसेच तो स्वतःही एक सुंदर Art Piece आहे.

**प्रश्न:** वा! काय सुंदर विचार आहे! सुहास, स्नेहदीपच्या वाचकांसाठी तुम्ही आपले विचार व अनुभव सांगितलेत, तसेच नखचित्रकला या एका अनोख्या कलाप्रकाराबद्दल इतकी मौलिक माहिती दिलीत, त्याकरता धन्यवाद. स्नेहदीपच्या वाचकांसाठी तुमच्या नखचित्रांचे काही नमुने दाखवाल का?

**उत्तर:** अगदी आनंदाने. माझ्या या आवडत्या कलेविषयी काही सांगायची संधी दिल्याबद्दल तुमचे आभार आणि स्नेहदीपला शुभेच्छा!

# सुहास तवकर यांची काही निवडक नखचित्रे



Pubilious Dancers



Radha



Bird



Mohenjodoro Seal



# कशेळी, उगवत्या सूर्याचे गाव

**जयंत विठ्ठल कुळकर्णी**

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील कशेळी हे आमचे गाव. सूर्याची जी थोडीफार देवळे भारतात आहेत त्यातील एक कनकादित्य हे सर्वात प्रसिध्द व मोठे देवालय आमच्या कशेळीतले समजले जाते. रोज दिसे त्याला कोण पुसे? असे जरी असले तरी सूर्याचे देऊळ ही उभ्या देशातील दुर्मिळ चीज आहे. कनकादित्य म्हणजे साक्षात सूर्य. त्यामुळे जपान हा जसा उगवत्या सूर्याचा देश, तसा कशेळी हा उगवत्या सूर्याचा गाव!

ह्या गावाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, एका बाजूला पसरलेला अथांग अरबी समुद्र व दुसऱ्या बाजूला डोंगरात विसावलेलं निसर्गरम्य हिरवेगार शांत गाव. नारळी, पोफळी, आंबे, फणस, केळी, काजू, अननस, रातांबे, चिंच व करवंदे हा कशेळीतील मेवा. लाल मातीतलं, चिरेबंदी-लाल कोलारू घरे, त्या बाजूला असलेल्या कोळंब्यांच्या विहिरी, गुरांचे गोठे, खोप्या, झोपाळे, शेणाने सारवलेल्या पडव्या व प्रशस्त आगर असलेल्या जमिनी असा हा गावचा थाट. जास्त करून कऱ्हाडे ब्राह्मणांची वस्ती. त्यामुळे या गावाची ख्यातीही महान आहे. महापंडित प्रा. राजारामशास्त्री भागवत, इतिहास संशोधक पंडित त्र्यंबक शंकर शेजवलकर, नाटककार-कथालेखक व कवी विठ्ठल सीताराम गुर्जर, बाल-कुमार साहित्यिक भा. रा. भागवत, उद्योगपती शं. बा. ओळकर, रामायण समालोचनकार व लेखक र. भ. कळके, उत्कृष्ट तबलावादक सखारामपंत भागवत व रामभाऊ नाफडे आणि इंग्रजीचे सुप्रसिध्द प्राध्यापक-साहित्यिक-व्याख्याते-वक्ते वि. ह. कुळकर्णी (माझे वडील) अशा विद्वान व्यक्तींचे भूषण असलेले कशेळी गांव! पूर्वी कशेळीला जाण्यासाठी एस्. टी. व आगबोटीचा प्रवास असे. मुसाकाजी हे बंदर. आता कोंकण रेल्वे, डांबरी रस्त्यामुळे मोटार-गाड्या व कनकादित्य ह्या सूर्य देवतेमुळे, कोकणदर्शनच्या तेथे होण्याऱ्या सहलींमुळे ह्या कशेळी गावाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तसं पाहिलं तर कनकादित्य प्रमाणे कशेळीत, लक्ष्मीनारायणाचेही प्रशस्त देवालय आहे. आमचे ते कुलदैवत. हे देऊळ वरच्या वाड्यात तर कनकादित्य मंदिर खालच्या वाड्यात आहे. कार्तिकात लक्ष्मीनारायणात व रथसप्तमीला कनकादित्यात मोठ्या प्रमणात उत्सव होतात. त्यामुळे बाहेरून

येणाऱ्या असंख्य भाविकांची जणू यात्राच तेथे त्यावेळी भरते.

आज प्रत्येक गावाला शहरी रूप यायला लागले आहे. मात्र, आमच्या कशेळीला अजून तसे रूप आलेले नाही. माझ्या मते येऊही नये कारण, स्वत:चे एक खास निसर्गाने देणगी दिलेले आटोपशीर व अत्यंत देखणे रूप नष्ट होईल, यात वाद नाही. लोकांमधील जिव्हाळा, आत्मीयता, प्रेम व आपुलकी आजही तेथे शाबूत आहे. नव्याने नव्या पध्दतीची काही ठिकाणी घरेही होताहेत, परंतु गावाला साजेशी शोभतील अशी. गावाचे सौंदर्य व निसर्ग बिघडवणारी नव्हेत. दाटीवाटीने



*कशेळीचे भूषण, सुप्रसिद्ध कनकादित्य मंदिर*



*निसर्गाची देणगी लाभलेलं सुंदर असे कशेळी गाव*

असलेली झाडे, बागायती, भाताचे मळे, पाटाचे पाणी, मोजकीच दुकाने, व पाऊलवाटा अजूनही आहेत. सभोवती चिरेबंदी पोवळी व पापडी अशा प्रशस्त आवारांसह कनकादित्य व लक्ष्मीनारायण देवालयात आजही दिसून येतात. थोडक्यात, 'जुन ते सोनं' ही भावना कशेळीकर अभिमानाने जपून आहेत. याबरोबर ही दोन देवालये त्या कशेळीचे वैभव आहे.

पूर्वी आमच्या वडिलांनी एक खास साहित्यिकांची सहल कशेळीला नेली होती. त्यात सुप्रसिद्ध अनंत काणेकरही होते. पुढे त्यांनी कशेळीबद्दल एका लेखात म्हटलं होतं की, 'कशेळी हे नुसते कऱ्हाडे ब्राह्मणांचेच गाव नाही तर, तेथील काजूची उसळ व अमृत्या फणसही तितकाच प्रसिद्ध आहे.' हो, आमच्या संपूर्ण कशेळी गावात आमच्या आगरातील-घरातील, अत्यंत गोड व रसाळ असलेला असा हा बरका फणस. तो इतका गोड-मधुर आहे की, कालांतराने त्याला 'अमृत्या' हे योग्य नाव पडले. अजूनही तो अमृत्या त्याच दिमाखाने मान ताठ करून आहे. मी ही माझ्या काही मित्रांना कशेळीस घेऊन गेलो होतो. ज्यांनी कोकणच काय, परंतु झाडाला फणस कसे लागतात तेही आयुष्यात कधी पाहिले नव्हते. त्या सर्व मित्रांना आमचं गाव दाखविलं व अमृत्या फणसाचे गरे खायला दिल्यावर ते तृप्त झाले होते. आज ही ते सर्वजण कशेळीची आठवण काढतात.



*कशेळीचे आणखी एक भूषण, लक्ष्मीनारायण मंदिर*

असे हे उगवत्या सूर्याचे आमचे कशेळी गाव. महाराष्ट्राच्या नकाशात दाखविलेलं कोकणपट्टीतलं कनकादित्याचं गाव. आपणही जरूर आमच्या गावाला केव्हातरी एकदा भेट द्या. आपल्या निश्चित पुण्यच पदरी पडेल यात शंका नाही! आज त्याबद्दलची अधिक माहिती इंटरनेटवरही उपलब्ध आहे. कृपया त्याचाही लाभ घ्यावा. त्याचा पत्ता हा असा: http://www.ratnagiriinfo.com/Tourism/Kanakaditya.html.

*jvkny1@gmail.com*

*****

## Many Happy Returns Of The Day
## अर्थात
## “होवोत या दिनाची आवर्तने अनेक"



महाराष्ट्र मंडळाचे दिलखुलास, मिस्कील व अजातशत्रू सदस्य **श्री. विजय कृष्णराव कोल्हटकर** यांनी ११ नोव्हेंबर रोजी आपला ७५ वा जन्मदिन, जगन्नियंत्याला धन्यवाद देत प्रार्थनापूर्वक साजरा केला. १९६० साली बारामतीसारख्या छोट्या गावातून उच्च शिक्षणासाठी न्यूयॉर्कला येणे, न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीतून एम.बी.ए. पदवी मिळविणे व युनायटेड एअरलाईन्ससारख्या मान्यवर विमानकंपनीत स्वतःच्या कर्तबगारीला प्रतिष्ठा मिळवून देत, तब्बल चौतीस वर्षांनी सर्व्हिस डायरेक्टर म्हणून सेवानिवृत्त होणे हा त्यांचा कर्तृत्व-प्रवास अभिनंदनीय व कौतुस्कापद आहे. कौतुस्कापद एवढ्यासाठी की १९६० साली, महाराष्ट्रातील एखाद्या खेडेगावातून, उच्च शिक्षणासाठी सात समुद्र ओलांडण्याचे धाडस करणारे फार कमी होते.

हसणे, हसविणे व उसंत मिळताच जीवनात हास्यविनोदाची मैफल रंगवून समरसून जगणे ही विजयजींच्या स्वभावाची ‘खासियत’, असे शेकड्याने जन्मदिन साजरे करण्याचे भाग्य त्यांना देवो हीच शुभकामना. महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी व सदस्यांतर्फे या विशेष वाढदिनानिमित्त विजयजींना अभिवादन, त्यांचे हार्दिक अभिनंदन व अभीष्ट चिंतन.

*****

## आगामी तिमाहीतील महत्त्वाचे दिवस

| | |
|---|---|
| शनिवार १५ जानेवारी - मकरसंक्रांती | शनिवार १९ मार्च - होळी |
| शनिवार २२ जानेवारी - संकष्ट चतुर्थी | रविवार २० मार्च - धुलिवंदन |
| बुधवार २६ जानेवारी - गणतंत्र दिन | मंगळवार २२ मार्च - अंगारकी |
| सोमवार २१ फेब्रुवारी - संकष्ट चतुर्थी | सोमवार ४ एप्रिल - गुढीपाडवा |
| बुधवार २ मार्च - महाशिवरात्री | |

# दोन अभिनव पाककृती

नीला इनामदार

## प्रॉन्स कॉर्न पकोडे

<u>साहित्य:</u>

३ कोवळी मक्याची कणसे, दीड वाटी प्रॉन्स (कोलंबी), २ टेबलस्पून मिरची-आले-लसूण वाटण, २ कांदे (बारीक चिरून), मीठ चवीप्रमाणे, मिरीपूड पाव टीस्पून, पाव कप ब्रेडचा चुरा, १ टेबलस्पून तेलाचे मोहन, तळण्यासाठी तेल

<u>कृती:</u>

कणसे किसून, त्यात सर्व पदार्थ घालून, १ टेबलस्पून कडकडीत तेलाचे मोहन घालून, मिक्स करून तळणे.

## फळांचे स्वीट

<u>साहित्य:</u>

एक मध्यम आकाराची पपई, एक आंबा, एक संत्रे, एक सफरचंद, एक केळे, ५-६ जर्दाळू, ३ टेबलस्पून साखर, एक कप मलई (हवी असल्यास)

<u>कृती:</u>

जर्दाळू रात्रभर पाण्यात भिजत घालावेत. सकाळी त्यातील बिया काढून त्याच पाण्यात शिजवून घ्यावेत. बिया फोडून आतील बदामाचे काप करून ठेवावेत. फळांच्या फोडी कराव्यात. साखरेत थोडे पाणी घालून पाक करावा. पाण्यात लिंबाचा रस पिळावा. पाक थंड झाला की फळांवर ओतावा. जर्दाळूचे मिश्रण त्यावर ओतावे.

नंतर प्रत्येकासाठी एकेका बाउलमध्ये फळांचे स्वीट घालून, वर थोडी मलई घालून, शोभेसाठी बदामाचे काप पसरावेत.

ninamdar47@yahoo.com

## मद्रासीने केला मराठी भ्रतार

काही वर्षांपूर्वी गाजलेल्या या मराठी नाटकात मद्रासी मुलगी व मराठी मुलगा यांच्या विवाहातून उद्भवणाऱ्या परिस्थितीचे विनोदी ढंगातील सादरीकरण होते. आता जग बरंच जवळ आलं असून या पद्धतीच्या विवाहांचे अप्रूप उरलेले नाही. तरीही दोन भिन्न संस्कृतींतील दोघं जण, संपूर्ण आयुष्य एकेमेकांच्या साथीने घालवण्यासाठी एकत्र येतात, तेव्हा निदान सुरवातीच्या काळात तरी तडजोडीचे, गैरसमजांचे व गोंधळ -घोटाळ्याचे अनेक प्रसंग येणे स्वाभाविक आहे. स्नेहदीपच्या वाचकांपैकी कोणाला जर हा अनुभव आला असेल तर त्यांनी स्नेहदीपच्या माध्यमातून इतर वाचकांनाही कथन करावा ही विनंती. मराठीतून लिहिणे जर शक्य नसेल तर इंग्रजीत लिहून पुढील पत्त्यावर पाठवा: snehadeep@maharashtramandalny.com.

धन्यवाद.

--संपादक



# खाजवा डोके / Brainteaser



Illustration by Suhas Tavkar

एका आंतरशालेय स्पर्धेत न्यू यॉर्कच्या एका शाळेतील चार विद्यार्थ्यांचा संघ अंतिम फेरीत पोचला. अंतिम फेरीसाठी त्यांना एका खोलीत नेण्यात आले व बेसबॉलच्या सात टोप्या दाखवण्यात आल्या - चार लाल आणि तीन हिरव्या. चौघांच्याही डोळ्यांवर पट्टी बांधून प्रत्येकाच्या डोक्यावर एक टोपी घालण्यात आली. त्यानंतर त्यांना एका रांगेत, एकापाठोपाठ असे उभे करून पट्टी सोडण्यात आली. रांगेतल्या चौथ्या मुलाला पुढची तिन्ही मुलं दिसत होती, तिसऱ्याला पुढची दोन तर दुसऱ्याला पुढचा एक. भिंतीपाशी उभ्या असलेल्या पहिल्या मुलाला इतर कोणीच दिसत नव्हतं. त्यांच्यापैकी कोणालाच स्वतःच्या डोक्यावरची टोपी दिसत नव्हती.

रांगेतल्या चौथ्या मुलाला विचारण्यात आले की त्याच्या डोक्यावर कोणत्या रंगाची टोपी आहे. जरी त्याला पुढच्या तिन्ही मुलांच्या डोक्यावरील टोप्या दिसत होत्या तरीही तो स्वतःच्या डोक्यावरील टोपीचा रंग ओळखू शकला नाही. मग तोच प्रश्न रांगेतल्या तिसऱ्या व दुसऱ्या मुलांना विचारण्यात आला, पण त्यांनाही त्याचे उत्तर देता आले नाही. भिंतीपाशी उभ्या असलेल्या पहिल्या मुलाला जेव्हा हाच प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्याने ताबडतोब मोठ्या आत्मविश्वासाने उत्तर दिले, "माझ्या डोक्यावर लाल टोपी आहे." त्याचे उत्तर बरोबर होते.

अशी कल्पना करा की तुम्ही रांगेतील पहिला मुलगा आहात आणि या उत्तराचा खुलासा करा.

(तुमचे उत्तर २८ फेब्रुवारी २०११ पर्यंत snehadeep@maharashtramandalny.com येथे पाठवा. अचूक उत्तर पाठविणाऱ्यांची नावे पुढील अंकात प्रसिद्ध करण्यात येतील.)

In a competition for school children, the best and brightest of a New York public school reached the final. The team comprised of four young boys. In the final round they were taken to a room and were shown seven baseball caps – four of them red and the other three green. All four were blindfolded and a cap was placed on each one’s head. Then they were made to stand in a row – one behind another – and the blindfold was removed. Now the fourth boy in the row was able to see the other three boys in front of him, the third boy was able to see two in front of him, whereas the second boy was able to see only one boy in front of him. The first boy, who was facing the wall, could see no one. None of them were able to see their own cap.

Fourth boy was asked if he could tell what color his cap was. Though he was able to see caps on the heads of the other 3 boys in front of him, he was unable to answer. Question was repeated to the third and second boys but they too could not answer. As soon as the same question was put to the first boy, who was facing the wall, he immediately answered with full confidence, “I am wearing a red cap” and he was right.

Imagine you are the first boy in the row and try to explain the answer.

(Please send your answer by 28th February 2011 to snehadeep@maharashtramandalny.com. We shall publish your name in the next issue if your answer is correct).